स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयास पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केला जाणारा संशोधन आराखडा

(Synopsis)

‘‘महात्मा बसवेश्वरकालीन संसदीय प्रशासन आणि आधुनिक काळातील लोकशाही प्रशासन व्यवस्था : एक अभ्यास’’

संशोधक

पंडित हणमंतराव श्रीरामे

मार्गदर्शक

डॉ.व्ही. आय. पाटील

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख,

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

मार्च २०२२

१. प्रस्तावना

राजकीय परिवर्तन हा समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेचाच एक भाग असतो. आधुनिक काळातील राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी राजकीय परिवर्तनाच्या सकल्पनेची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. त्यामुळे राजकीय विश्लेषणात राजकीय परिवर्तन या संकल्पनेला विशेष महत्त्व आले आहे.

ग्रीक काळातील राज्यशास्त्राचे जनक ऑरिस्टॉटल यांच्या लिखानातून राजकीय परिवर्तनाचे संदर्भ अभ्यासता राजकीय परिवर्तन चक्राकारगतीने होतात या त्यांच्या मताला दुजोरा मिळतात. कोणत्याही आर्थिक सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेवर राजकीय परिवर्तनाचा प्रभाव पडत असतो. शांतता प्रस्थापनेसाठी केल्या जाणाऱ्या वाटाघाटी मधूनही अनेक राजकीय परिवर्तने होत असतात. नवमूल्यांच्या स्थापनेसाठी आणि जून्या राजकीय संरचनेत बदल होण्यासाठी प्रामुख्याने राजकीय परिवर्तने होत असतात.

महात्मा बसवेश्वर यांनी समाजाचे प्रतिनिधित्वकेले आणि प्रतिकूल परिस्थितीशी लढा देत आपले राजकीय वलय निर्माण केले आहे. लोकशाही शासनपध्दती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण जगाला संविधानाच्या रुपात बहाल केली तर महात्मा बसवेश्वर यांनी याच विचाराला पोषक विचार बाराव्या शतकात मांडले.

दास्याचे पोषण करणारी, जातीयता वाढविणारी आणि अन्यायाला मदत करणारी व्यवस्था ही लोकशाही नव्हे. परस्पर विचारविनिमय करणे व सहकार्य करणे हेच या व्यवस्थेचे मूलभूत प्रमाण व्हावे. जेथे अन्याय, अराजकता आहे, तेथे लोकशाही डोके वर काढणार नाही. अल्पसंख्यांकांचे शोषण, मग ते कोणत्याही रुपाने का होईना, ते लोकशाही व माणुसकीविरोधी आहे असेच म्हणावे लागेल. आजच्या प्रमाणे बसवण्णांच्या काळात लोकशाहीची कल्पना तात्त्विकपणे प्रकट होऊन तिचा विकास झाला नसला तरी त्यातील भावसत्त्व त्यांच्या जीवनात दृग्गोचर झाले होते हे सत्य आहे. अनुभव मंटपाची व्यवस्था आणि तेथे चालत असलेली चर्चा हेच तेथील लोकतंत्राच्या मनोधर्माचे निदर्शन आहे. सामाजिक व धार्मिक समस्या निर्माण झाल्या. तेव्हा स्वत: विचारवंत

असलेले बसवेश लिंग, वय, जातिभेद न करता सर्वांबरोबर समालोचनक करित असत. आजच्या नेत्यांप्रमाणे ते जातीयवादी नव्हते. आधुनिक मठाधिपतीप्रमाणे पक्षपात करित नव्हते. सर्वसमानतेच्या आधारे सर्व कुळजातीचे मिलन घडवावे हाच त्यांचा मानस होता, आंतरिक इच्छा होती. आजच्या पीठाधिपतीप्रमाणे त्यांनी जातीयतेला खतपाणी घातले नाही. स्वातंत्र्य, समानता, बंधुभाव हेच मुख्य आदर्श म्हणून त्यांनी त्यांचा स्वीकार करुन, त्यांच्या पायावरच लिंगायत धर्माची स्थापना केली. हेच त्यांच्यातील विशाल मनोधर्म आणि मानवतेसाठी भूत आहेत. जातीतील भेदभाव, स्पृश्यास्पृश्य भेद अगर कोणताही सामाजिक रोग असणे लोकशाहीला मारकच होय. हे देशाच्या सुरक्षिततेला अपायकारक आहे असे ते मानित होते. लिंगधारकांच्यात स्थानमानाचे अंतर नसल्यास अल्पसंख्या बहुसंख्यांकांची समस्या असणे शक्य नाही. "कोणत्याही कुळात जन्म घेतला तरी काय झाले? कुलज असे शिवलिंग धारकच !" विटाळ असे का लिंग असल्याठायी अपवित्र बोल बोलणेच घातक आहे, म्हणून जाती, कुळ, मतभेद यावर त्यांनी पडदा टाकला. बसव संदेशाच्या प्रकाशात भारत देशातील आजचे दृष्य पाहिल्यास इथे लोकशाहीच नाहीशी झालेली दिसून येते. जिकडे पाहावे तिकडे असमानता, कुणीकडे वळले तरी भेदभाव व पक्षपात, रोजरोजची हिंसा, अनाचार, अत्याचार, भ्रष्टाचारांचा नंगानाच चाललेला, सतत स्वार्थी लोकांचा संधीसाधूपणा, पक्षापक्षात हाणामारी... या सर्वात लोकशाही वाचणे शक्य आहे काय यावर क्षकिरण टाकून परीक्षा करायला हवी. अशा परिस्थितीत, अशा वातावरणात बसवण्णा असते तर त्यांनी श्वास बंद करुन शिवयोग समाधी घेतली असती. ते शंभर टक्के लोकशाहीचा पुरस्कार करित होते. इतकेच नव्हे, तर ते आधुनिकांच्यातील अत्याधुनिक होते असेच म्हणावे लागेल.

२. संशोधन विषयाचा अर्थ

महात्मा बसवेश्वरांचा परिचय

मंगळवेढा राज्यातील बागेवाडी या छोट्या गावात मंडगी मादिराज आणि मादलांबिका या वीरशैव कुळातील दांपत्याच्या पोटी झाला. वैशाख शुद्ध

तृतीया, अक्षय्य तृतीया दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला. महात्मा बसवेश्वर हे मादिराज आणि मादलंबिका यांचे तिसरे अपत्य होते. वयाच्या आठव्या वर्षी ज्ञान मिळविण्यासाठी ते कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे गेले, ते वीरशैव प्राचीन अध्ययन केंद्र होते. तेथे महात्मा बसवेश्वरांनी काही वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले.

महात्मा बसवेश्वरांची राजकीय परिवर्तनाची कृती :

काही समाजसुधारक विचार मांडण्याचे काम करतात, कृती समाजावर सोडतात. त्यांना बोलके सुधारक म्हटले जाते. काही कृती आणि उक्तीत मेळ घालून 'बोले तैसा चाले' याप्रमाणे परिवर्तनाच्या रस्त्यावर निग्रहाने चालणारे असतात. समाजव्यवस्थेचा राज्यव्यवस्था हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. समाजव्यवस्थेच्या परिवर्तनासाठी राज्यव्यवस्थेचा साधन म्हणून वापर करता येतो हे त्यांनी प्रांरभीच हेरले होते. राज्यव्यवस्थेच्या निर्णयनिर्धारण प्रक्रियेतूनच समाजाच्या जडणघडणीस पोषक बाबी ठरत असतात. त्यामुळे प्रथमत: राज्यव्यवस्थेचे शुध्दीकरण होणे गरजेचे आहे असा ठाम विश्वास महात्मा बसवेश्वरांचा होता. त्यांनी सर्वप्रथम तत्कालिन राज्यव्यवस्थेतील अनागोंदी, अराजकता नष्ट करण्याचे ठरविले. महात्मा बसवेश्वरांनी राज्यव्यवस्थेत आमुलाग्र परिवर्तन केले. जी आजच्याही राज्यव्यवस्थेत सुदृढी करणासाठी उपयुक्त व प्रेरणादायी आहेत. त्यामुळेच कल्याणाला कल्याणकारी राज्याचे स्वरुप प्राप्त झाले. नवसमाजव्यवस्था उदयास आली. त्यांनी कल्पिलेली राज्यव्यवस्था ही एखाद्या सुंदर स्त्रीने दागिने घालून मध्यरात्री जंगलातून सुरक्षितपणे एका गावाहून दुसऱ्या गावास जाण्याइतपत आश्वासक राज्यव्यवस्था कल्याणामध्ये त्यानी निर्माण केली. महात्मा बसवेश्वरांनी राज्यवस्थेच्या परिवर्तनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेता पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक ठरते.

राज्यव्यवस्थेच्या कार्यशैलीत बदल :

महात्मा बसवेश्वरांच्या राज्यव्यवस्थेच्या परिवर्तनातील आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे, त्यांनी त्या काळातील राज्यव्यवस्थेच्या कार्यशौलित बदल करुन तिची पुनर्बांधणी केली. ही पुनर्बांधणी राज्यव्यवस्थेच्या स्वरुप, भूमिका, कार्य व कार्यप्रणाली विषयी निगडित होती. महात्मा बसवेश्वरांनी राजेशाही व सरंजामशाहीच्या स्वरुपात फेररचना करणारा कार्यक्रम राबवला. हे करतांना महात्मा बसवेश्वरांनी राज्यव्यवस्थेने जनमताला प्राधान्य देवूनच राज्य कारभार करावा अशी नवी कार्यशैली रुढ केली. राज्यातील जनतेच्या कल्याणाची जबाबदारी राज्य संस्थेने स्वीकारुन लोककल्याणकारी कार्य पार पाडावित. राज्य ही संस्था मानवाने आपल्या कल्याणासाठीच निर्माण केली. सामूहिक जबाबदारीचा विचार रुजविला. धर्मांध किंवा ब्राम्हणी व पुरोहितशाहीचे संरक्षण करणाऱ्या राज्यव्यवस्थेला धर्मनिरपेक्ष चेहरा प्राप्त करुन दिला. धर्माचे मूल्यमापन करुन आधुनिक मापदंडाच्या आधारावर मध्ययुगीन व्यवस्थेच्या कार्यशौलित बदल केला. राज्य संस्थेने सामाजिक सुरक्षितता, सामाजिक कल्याण व सामाजिक न्यायाच्या दिशेने कार्य करावे हा विचार तत्कालिन राज्यव्यवस्थेच्या शिलेदारामध्ये रुजविला. लोककल्याणकारी समाज व न्याय व्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असा राजकीय नेता शरणांच्या माध्यमातून उभा केला. महात्मा बसवेश्वरांच्या राज्यव्यवस्थेच्या परिवर्तनाच्या कार्याने खुश होऊन एक ठिकाणी बिज्जळाने खालील उद्‌गार काढले

माझ्या राज्याचे रक्षण नि सुधारणा तुझीच बसवा,
माझी किर्ती आणि अभिमान तुझेच बसवा,
तुझ्यासारख्या नाही कोणी भंडारी बसवण्णा,
तुझ्या आगमनाने भांडार प्राप्त झाले बसवा

महात्मा बसवेश्वरांनी राज्यव्यवस्थेच्या कार्यशैलीत बदल करतांना नवी राजकीय संस्कृती रुजविली. जी राजकारण व राज्यकारभाराचे सामाजिकरण करणारी होती. राज्याची सुशासनाच्या दिशेने घडवणारी होती.

आदर्श राज्य व आदर्श नागरिकांची निर्मिती :

आदर्श राज्यव्यवस्था आदर्श नागरिकाशिवाय निर्माण होवू शकत नाही, असे राज्यशास्त्रज्ञ प्लेटो म्हणतो. प्लेटो व महात्मा गाांधीच्या मते, आदर्श नागरिक न्यायी, सुशिक्षित, सत्याग्रही, अहिंसक, कांचन व कामिनी पासून दूर राहणारे असावेत. प्लेटो व महात्मा गांधीचा हा विचार महात्मा बसवेश्वरांनी वास्तवात आणला. संकव्वा नावाच्या वेश्येस व्यवसाय सोडून अध्यात्मिक भक्तीच्यामार्गावर आणले. गाई चोरुन नेणाऱ्या चोरास महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपातील शरण बनविले. स्वतःच्या पत्नीच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरणाऱ्यास महात्मा बसवेश्वरांनी शरण बनविले. महात्मा बसवेश्वरांना मारण्यास आलेल्या चिक्कय्या मारेकरीही महात्मा बसवेश्वरांच्या तेजोमय मूर्तीने व घनत्त्वाने मोहित होवून शरण बनतो. मधुवरस नावाचा ब्राम्हण महात्मा बसवेश्वरांच्या अनुभवमंटपातील शरण बनवून आंतरजातीय विवाहास तयार होतो. भारत व जगाच्या विविध कोपऱ्यातील अनेक जातीजमातीचे लोक कल्याणाकडे येतात. या सर्वांना महात्मा बसवेश्वरांनी पंचाचार, षष्टथल व अष्टावरणाचे शिक्षण देवून आदर्श राज्याचे पाईक बनविले. १६ व्या शतकात हिंदवी स्वराज्यासाठी शिवाजी महाराजांनी जसे मावळे निर्माण केले. महात्मा गांधी, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, इ. सारखे सत्याग्रही निर्माण केले तसेच महात्मा बसवेश्वरांनी यांच्या अगोदर परिवर्तनाची पताका घेऊन मार्गस्त होणारे शरण निर्माण केले.

कल्याण नगर राज्यात अशा सदाचारी, चारित्र्यसंपन्न, ज्ञानी, अनुभवी, कायकी, स्वतःला जाणणाऱ्या देशभरातील निर्लोभी लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. परिणामी कल्याणामध्ये सुख, शांतता व समाधानमय वातावरण निर्माण झाले. सामाजिक सलोखा वाढला. सामाजिक आरोग्य सुदृढ बनले. जनतेत आपुलकी, प्रेम निर्माण झाले. काय प्रेमी श्रमजिवी लोकांचा समूह तयार झाला. हा सगळा प्रताप महात्मा बसवेश्वरांच्या समाजसुधारणेच्या कार्याचा होता.

समतेचा पुरस्कार :

राज्यशास्त्रात समता हे अतिशय महत्त्वाचे तत्त्व आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत समता या तत्त्वाला अधिक महत्त्व असते. भारताच्या प्राचीन इतिहासापासून ते उत्तर आधुनिककाळापर्यंत जाती व्यवस्थेने बंदिस्त समाज व्यवस्था नष्ट करुन समाताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. त्यास पूरक असे समतेचे तत्त्वज्ञानही अनेक विचारवंत, समाजसुधारकांनी मांडले आहे.

भारतात मध्ययुगात समतेच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करुन समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग महात्मा बसवेश्वरांनी केला आहे. महात्मा बसवेश्वरांनी समकालीन विषमतापूर्ण सामाजिक संरचनेला विरोध केला. महात्मा बसवेश्वरांचे वचन साहित्य समतेची खाण आहेत. समताधिष्टित समाज व्यवस्था निर्माण करण्याच्या कार्याची सुरुवात महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक क्षेत्रातून प्रथम केली. समतेच्या आड येणाऱ्या जातीयता, वर्णीयता, लिंगभेद यांना त्यांनी नाकारले. विषमतेच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करणाऱ्या वेद, पुराणे, शास्त्र यांना नाकारले. वौदिक कर्मकांडावरही त्यांनी कडाडून हल्ला केला. धार्मिक क्षेत्रातील विषमता नष्ट करण्यासाठी इष्टलिंगाचे साधन सर्वांच्या हातात दिले. धर्मस्वातंत्र्य हा महात्मा बसवेश्वरांच्या धार्मिक समतेचा पाया आहे.

महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक, आर्थिक समतेसोबतच राजकीय समानतेलाही महत्त्व दिले. राजकीय समतेसाठी प्रजाप्रभुत्ववादी व समाजवादी कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे स्वरुप वास्तवतेत आणले. अनुभवमंटप या बहुउद्देशीय संस्थेतून सर्वांना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. अभिव्यक्ती स्वांतत्र्याची समान संधी उपलब्ध केली. अनुभवमंटपामुळे सामाजिक सुरक्षिततेची भावना वाढीस लागली. अनुभवमंटपाने सामाजिक अभिसरण व समतेचे समिकरण साधले. स्त्री पुरुष हा भेद नष्ट केला. समतेचा वापर लोककल्याणाच्या दिशेने करावा. हा लोकशाहीचा नवा मार्ग रुढकेला. समता हे राज्यव्यवस्थेचे ध्येय असावे हा विचार स्वत:च्या कृतीतून राबविला. राज्याच्या

प्रशासनानेही समाज कल्याणाच्या दिशेने कार्य केल्यास समता प्रस्थापित होते हा विचार रुढ केला.

महात्मा बसवेश्वरांनी शरण चळवळीच्या साहाय्याने समाजातील असमानता आणि शक्तीचा विविध सरंचनाकडे लक्ष वेधले. कारण, या शक्तिसंरचनाचा प्रभाव लोकांच्या राजकीय स्वातंत्र्य आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेवर होता. याची जाण महात्मा बसवेश्वरांनी समाजात निर्माण केली. लोकशाही शासनासाठी लोकशाही समाज असणे आवश्यक असल्याचे ते मानत होते.

राज्यवाढावा वाटपाचा आग्रह :

राज्यवाढ वाटप हे प्रामुख्याने सत्ता, नैसर्गिक साधन संपत्ती, मानवी हक्क इत्यादीसाठी स्विकारण्यात आलेले तत्त्व होय. राज्यवाढ वाटपात साधनाची समानता सांगतांना राज्यवाढ वाटपाचे वितरण असे असावे की, त्यात प्रत्येकाचा वाटा समान असावा. राज्यवाढ वाटपाच्या समप्रमाणात वितरणासाठी महात्मा बसवेश्वरांनी श्रम आणि दासोह हे दोन मार्ग सांगितले. कारण, मानवी जीवनात सर्वच व्यक्तिमध्ये समान बुध्दीमत्ता व क्षमता असणे अशक्य आहे. जे शारीरिकदृष्ट्या अपंग, अंध, कमकूवत आहेत, त्यांच्यामध्ये असलेली क्षमता सामान्य व्यक्तिमध्ये असू शकत नाही त्यामुळे त्यास विषम परिस्थितीचा सामना करावा लागतो. महात्मा बसवेश्वरांचे राज्यवाढावा वाटपाचे धोरण समाजातून शोषण व संपत्तीचा संग्रह प्रवृत्तीस दूर करणारे आहे. भांडवलाची समानता वाढवणारे आहे. राज्याकडे वाढणारा वाटा हा समाजाकडूनच आलेला असतो तो समाजाकडेच न्यावा याचा निर्णय महात्मा बसवेश्वर घेतात. महात्मा बसवेश्वरांनी विकलांग, अक्षम व्यक्तिना लाभ देण्यासाठी राज्यवाढावा या संज्ञेचा वापर केला. अशा व्यक्तिच्या कल्याणाचा, सुरक्षिततेचा विचार समाजाला व राज्याला करावयास भाग पाडले.

मानवी हक्काचे समर्थन :

महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय परिवर्तनाच्या क्षेत्रातील अनेक कृतींपैकी एक अत्यंत महत्त्वाची कृती म्हणजे, त्यांनी मानवी हक्काचे केलेले समर्थन

होय. महात्मा बसवेश्वरांचे राजकीय व्यवस्थेविषयीचे विचार समजून घेता तेथे महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातून व्यक्त होणारे व मानवी हक्कास पूरक ठरणारे विचार अभ्यासले आहेत.

१२ व्या शतकातील जुलमी, अन्यायी समाज व राज्यवस्थेच्या युगात मानवी हक्कांच्या समर्थनार्थ अहिंसावादी भूमिका महात्मा बसवेश्वरांनी बजावली. त्यांनी सर्वच मानवाच्या जीवन जगण्याच्या हक्काचे समर्थन केले. प्रामुख्याने तत्कालीन समाज व्यवस्थेतील शूद्र, महिला यांच्या मानवी हक्काच्या संरक्षणार्थ खंबीर भूमिका मांडली. मानवी हक्क हे नैसर्गिक हक्क असतात. त्यामूळे त्यांना हिसकावून घेण्याचा अधिकार राजा, ब्राम्हण, पुरोहितांना नाही. महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटप नावाच्या संस्थेतून मानवाच्या विचार, स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, स्त्रियांच्या मानवी हक्काला संपूर्णपणे संपण्यात आले होते. अनुभवमंटपातून त्यांनी संघटन घडविले. उपनयन संस्कारास विरोध करुन स्त्रियांच्या मानवी हक्काचे संरक्षण केले. महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानातील न्याय, स्वातंत्र्य, समता तत्त्वज्ञान मानवी हक्कांची त्रिसूत्री आहे.

अनुभवमंटपः प्रत्यक्ष लोकशाहीसाठीची संसद :

१२ व्या शतकातील शोषणयुक्त, वैदिक, समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी अनुभवमंटपाची स्थापना केली. महात्मा बसवेश्वरांनी तत्कालीन पारलोकीक व जडवादी लोकांचे अज्ञान नष्ट करणे. अमरगणांच्यासह गुरु लिंगजंगमाची भक्ती करण्याच्या उद्देशाने कल्याणाला अनुभवमंटप बांधला. तसेच महात्मा बसवेश्वरांच्या पत्नी निलांबीका यांच्या वचनातून महात्मा बसवेश्वरांनीच अनुभवमंटपाची स्थापना केल्याचे दृष्टिक्षेपास पडते.

चेन्नबसव जौसे महान प्रसादि के द्वारा,
बसव ने अनुभवमंटप की स्थापना की और
आध्यत्मिकता के जीते जागते प्रतिमूर्ती बनाये ।
उन्होने दिव्य चेतना और सद् आचरण का अर्जन किया, और
सातसो सत्तर अमर संतो को निर्मित किया जो दिव्यता के देवदूत थे ।

उपरोक्त वचनातून अनुभवमंटपातील सदस्यसंख्या ७७० असल्याचे स्पष्ट होते. ७७० पैकी ७० स्त्री सदस्य होते. ज्यांना शरणी म्हणत असत. शरणशरणी सामूहिकपणे एकत्र येऊन विविध विषयावर मुक्त चिंतन करत. प्रथम महात्मा बसवेश्वरांच्या महामनेत (बसव निवास) अनुभवमंटपाचे कार्य सुरु केले होते.

अनुभवमंटप हे समाज सुधारणाच्या कार्याचे केंद्रस्थान होते. अनुभवमंटपातील सदस्यात अनेक जाती, पंथ, वर्णाचे व धर्माचे सदस्य होते. मादार चन्नय्या, डोहार कक्कय्या (अस्पृश्य), हरळया (चांभार), हडपद अपण्णा (न्हावी), मधुवरस (ब्राम्हण), किन्नरि बोमय्या (सोनार), किरात संगय्या (शिकारी), अंबिकार चोडय्या (केवर), रामण्णा (गुराखी), केतय्य (टोपली बनवणारा), गोल्हाळ (मेंढपाळ), शंकर दासिमय्या (शिंपी), आदस्य (अमीर), आयदक्के मारय्या (गरीब), रामितंदे (व्यापारी), नुलिय चंदय्या(कामगार), माडिवाळ माचय्या (धोबी), बसवय्या (सुकार), मादन्ना (सिपाही), चिक्कय्या (चोर), अल्लमप्रभुदेव (नटवर), ओकळू मुदय्य (शेतकरी).

तसेच अनुभवमंटपात अक्कानागलंबिका, गंगाबिका, नीलांबिका, कल्याणम्मा, वरदानी, दानम्मा, रेमव्वे, पद्मावती, काळम्मा, लिंगम्मा, अक्कमहादेवी, मुक्तायक्का, बोंतादेवी, लक्काम्मा इ. स्त्रिया पुरुषांसोबत बसून विचार विनिमय करत. इष्टलिंग दीक्षा घेत. वचनांची रचना करत महात्मा बसवेश्वरांच्या अनुभवमंटपात बहुजनांना अशी संधी देणे ही कृती प्रत्यक्ष लोकशाहीशी पुरक वाटते.

अ) अनुभवमंटपातील शरणांसाठी अनिवार्य पात्रता :

अनुभवमंटप हे एक मुक्त विद्यापीठ होते. महात्मा बसवेश्वरांनी आदर्श व समताधिष्ठित समाज निर्मितीची ध्येय वास्तवात आणण्यासाठीच अनुभवमंटपाची निर्मिती केली होती. अनुभवमंटपात कोणालाही प्रवेश नव्हता. सदस्यत्त्वासाठी काही आचारसंहिता, अटी, पात्रता ठरविण्यात आल्या होत्या त्या पुढीलप्रमाणे

१. नि:स्वार्थी, त्यागी असावा

२. परधन, परस्त्रीची आसक्ती नसावी.

३. अंहकार शून्यता असावी

४. अंतरंग व बहिरंग शुद्धता असावी.

५. शुद्धी, सदाचार, समता, मानव, प्रेमवादी दृष्टी असावी.

६. कायक वे—कैलास मान्य करणारा

७. लिंगांग सामरस्याची साधना करणारा

८. अष्टावरण—पंचाचार—षटस्थल आचरण

९. विनम्र भक्ती

१०. सतशील—सदाचार

११. बोलण्या —वागण्यातील समन्वय

१२. आत्मपरिशोधन करणारा मनोभाव

१३. साधनेची तत्परता

१४. प्रपंच आणि परमार्थ यातील समन्वय

१५. समानशीलता

१६. कायकनिष्ठा

१७. दासोहभाव

१८. न्यायनिष्ठुरता

१९. सर्व प्राणिमात्रांच्या सुखाची अपेक्षा ठेवणारी समदृष्टी

२०. विश्वबंधुत्त्वाची भावना

थोडक्यात, चारित्र्यसंपन्न नि:स्वार्थी, श्रमाला स्वर्ग मानणारा, सदाचारी, बोले तसा चालणारा, एकेश्वरवादी इ. अनुभवमंटपातील सदस्य होते. यामुळेच १२ व्या शतकात कल्याणामध्ये सदाचारी पुरुष, स्त्री व समाज निर्माण झाला.

ब) शरणांसाठी निर्देशक तत्त्वे :

अनुभवमंटप संस्थेची निर्मिती समताधिष्ठित व काय जीवी समाज निर्माण करण्यासाठी केलेली होती. काही आधारभूत तत्त्वांचे पालन अनुभवमंटप या सामाजिक संस्थेमार्फत केले जात असत. ही आधारभूत तत्त्वे पुढीलप्रमाणे

१. सर्व स्त्री—पुरुष समान आहेत.
२. कोणत्याही व्यक्ती जन्माने, लिंगभेदाने, वर्णभेदाने किंवा व्यवसायाने श्रेष्ठ किंवा निष्ठ नाही.
३. पुरुष—पुरुष किंवा स्त्री—पुरुष यात कोणताही भेद नाही.
४. स्त्रियांना पुरुषांसारखीच आपली उन्नती करुन घेण्याचा अधिकार आहे.
५. प्रत्येकाने स्वच्छेने आपल्या व्यवसायाची निवड करावी.
६. स्त्रियांसुध्दा आपल्या आवडीचे अर्थार्जनाने कार्य करू शकतात.
७. सर्वच व्यवसाय प्रतिष्ठेच्या दृष्टीने समान आहेत.
८. जात, वर्ण व आश्रम यांचा त्याग करावा, श्रेष्ठ—निष्ठता पाळू नये.
९. आपला व्यक्तिविकास आपल्या कायकातून घडवून आणावा.
१०. ध्यानधारणेसाठी, लिंगार्चनेसाठी सर्वसंग परित्याग करुन अरण्यवासात जाण्याची गरज नाही.
११. आंतरजातीय विवाह आणि सर्व जाती वर्णातील समूह भोजनास उत्तेजन देण्यात यावे.
१२. अस्पृश्येतेला समाजात कोणतेही स्थान नाही.
१३. प्रत्येक मानवाला अध्यात्मिक आणि सामाजिक प्रश्नांबाबत मुक्त चिंतन करण्याची मुभा आहे.
१४. अनुभवमंटप हे मार्गदर्शक तत्त्व मुक्त चिंतनासाठी आणि अध्यात्मिक प्रगतीसाठी आहे.
१५. धार्मिक शिक्षणासाठी लोकभाषा हे उत्तम माध्यम आहे.
१६. सर्व व्यक्तींना आत्मिक उन्नतीसाठी अध्यात्मिक चर्चेत भाग घेण्याचा सारखाच अधिकार आहे.

अनुभवमंटातील कामकाज समजावे म्हणून कन्नड या लोकभाषेतूनच अनुभव मंटपात विचार मांडण्यास प्राधान्य दिले. एकंदरीत अनुभवमंटप ही जगातील पहिली विद्वानांची व विचारवंताची **पार्लमेंट** होती, ज्यात स्त्री व पुरुषांना समान मानून सदस्यत्त्व दिले गेले होते. अनुभवमंटपातून मानवी व राजकीय मूल्यांचे चर्चेअंती बीजारोपण करण्यात आले होते. अनुभवमंटप सर्वांना

चर्चेची, सहभागाची समान संधी देणारे व्यासपीठ होते. राजव्यवस्थेला आधुनिक मुलामा देणारे विचारपीठ महात्मा बसवेश्वरांनी निर्माण केले होते.

३. संशोधन विषयाचे महत्व

लोकशाही शासन प्रणाली ही भारतीय राज्यव्यवस्थेची संचालन पध्दती आहे. भारतात स्वातंत्र्याची रचनापध्दती आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्मितीत भारतासाठी लोकशाही शासनपध्दतीचा स्विकार करावा ही सूचना केली. आणि त्यानुसार भारतातील प्रत्येक राजकीय, सामाजिक कार्ये ही लोकशाही पध्दतीने होतांना दिसतात. असे असले तरी, लोकशाही शासन व्यवस्थेचे पाळेमुळे ही १२ व्या शतकात सुद्धा अनुभवयास मिळालेली दिसतात. १२ व्या शतकातील थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर यांनी स्थापन केलेला अनुभवमंटप म्हणजे त्या काळातील संसद होय असे म्हटले जाते. आज जी लोकशाही आपण अनुभवत आहोत १२ व्या शतकात त्याच धर्तीवर कार्यकरणारी संसदीय कार्यप्रणाली महात्मा बसवेश्वर यांनी कोणत्या तत्वांच्या आधारे उभारली, त्यातील कार्ये कोणती, सामाजिक व राजकीय व्यवस्थेसाठी अनुभवमंटप या पद्धतीचा काय उपयोग होता. आधुनिक काळातील लोकशाही प्रणालीला महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपाचा काय उपयोग होऊ शकतो या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषय महत्वाचा वाटतो.

आज जी लोकशाही शासन प्रणाली महत्वाची मानली जाते. तीचा मुलाधार भारतीय संविधान आहे. परंतु १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी वेगवेगळया जाती धर्मातील लोकांना एकत्र करुन, स्पृश्य अस्पृश्य असा भेदभाव दूर करीत अनुभव मंटपाची स्थापना केली. अनुभव मंटपातील सभासदांना शरण असे म्हटल्या जात होते. श्रम हाच ईश्वर हा मूलमंत्र बसवण्णांनी भारतीय अर्थव्यवस्थेला दिला. श्रमाला व्यवसायाला कायकाला मानाचे, सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले. दिवसभर कष्ट करून शरण संध्याकाळी अनुभवमंटपात एकत्र येत. विचारविनिमय, चर्चा करत. शरणांच्या स्वानुभवातून वचने जन्माला आली. तीच वचने म्हणजेच भारतीय संविधानाचा

गाभा आहे. संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, स्त्री—पुरुष समानता ही मूल्ये शरणांच्या समताधिष्ठित वचनात दडली आहेत. याबाबत अध्ययन करण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत विषयाची निवड संशोधनासाठी केली आहे.

४. संशोधन विषयाची निवड

आधुनिक काळातील लोकशाही शासन प्रणाली, गणराज्य भारतात या पध्दतीचा झालेला स्विकार, दिवसेंदिवस बदलत जाणारी राजकीय स्थिती यामुळे भारतीय लोकशाहीचा चेहरा मोहरा बदलला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यव्यवस्थेला लोकशाहीची चौकट उभी करुन दिली असली तरी बाराव्या शतकात अशाप्रकारची सांसदीय कार्यप्रणाली अस्तित्वात असल्याचे पुरावे आपणास महात्मा बसवेश्वरांच्या विचारात आढळतात. आजची लोकशाही शासनप्रणाली आणि बसेवश्वरांच्या काळातील सांसदीय प्रशासन व्यवस्था अभ्यासण्यासाठी या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

५. संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. महात्मा बसवेश्वरांच्या राज्यव्यवस्थेसंबंधी कार्याचा आढावा घेणे

२. महात्मा बसवेश्वरांची अनुभव मंटपाची संकल्पना अभ्यासणे

३. बसवकालीन संसदीय प्रशासन व्यवस्थेचे अध्ययन करणे.

४. महात्मा बसवेश्वरकालीन संसदीय प्रशासन आणि आधुनिक काळातील लोकशाही प्रशासन व्यवस्था यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६. संशोधनाची गृहितके

१. महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणाबाबत आपले विचार मांडले आहेत.

२. महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक परिवर्तनाचा मूलाधार राज्यव्यवस्था असल्याने अनुभव मंटपाची स्थापना सांसदीय लोकशाही प्रणालीच्या रुपात केली आहे.

७. संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन हे तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारी दुय्यम तथ्ये ही विविध पुस्तके, प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रंथ, अनुवादीत ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध व नियतकालिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळ इत्यादींच्या माध्यमातून संग्रहीत केले जातील. संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

८. संशोधन समस्या

भारतीय सांसदीय शासन प्रणाली ही जगातील एक महत्वपूर्ण शासनप्रणाली समजली जाते. या लोकशाही सांसदीय प्रणालीची पायामुळे १२ व्या शतकात सुद्धा महात्मा बसवेश्वरांच्या कार्यात आणि वचनात दिसून येते. या अनुषंगाने १२ व्या शतकात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वाचा अंगीकार करुन महात्मा बसवेश्वरांनी अनुभव मंटप नावाची संसद उभी केली. म्हणजेच आधुनिक लोकशाहीची वैशिष्ट्ये महात्मा बसवेश्वरांच्या विचारात आढळते याचे अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत संशोधन समस्येची निवड केली आहे.

९. संशोधनाचा कालावधी, व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत संशोधन विषय हा महात्मा बसवेश्वरांच्या राजकीय कार्यापुरते मर्यादीत आहे. यामध्ये प्रामुख्याने १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी मांडलेल्या राजकीय कार्यासंबधी विचार अभ्यासण्यात येतील.

१०. प्रकरणांची रुपरेषा

१. प्रस्तावना

२. संशोधन साहित्याचा आढावा

३. महात्मा बसवेश्वरांचे राजकीय कार्य

४. महात्मा बसवेश्वरांच्या विचारातील सांसदीय लोकशाही प्रणाली

५. निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची

१. दोडमनी शालिनी (२००७), महामानव बसवण्णांची समग्र वचने, उगारखुर्द.

२. एकलारे चंद्रकांत (२००८), क्रांतीकारी विचारक महात्मा बसवेश्वर, मुक्तरंग, प्रकाशन, लातूर.

३. घुगरे सूर्यकांत (१९९९), वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक्स, कोल्हापूर.

४. घुगरे सूर्यकांत (२०००), समग्र क्रांतिकारी बसवेश्वर, धारवाड, कन्नड अध्ययनपीठ, कर्नाटक विश्वविद्यालय.

५. करडीगुद्दी राजशेखर (२०१०), कायक –दसोह–प्रसाद, हिरेमठ संस्थान, महाराष्ट्र बसव परिषद, भालकी.

६. करजकर विजयकुमार (२००७), बसवेश्वर आणि लिंगायत, बेळगाव ॲकॅडमी.

७. मेनकुदळे अशोक (२००८), आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद हिरेमठ संस्थान, भालकी, जि.बीदर.

८. पुजारी सिद्धराम (२००१), लिंगायत धर्म– एक आत्मचिंतन अधोगती किती, प्रगती किती, भवितव्य काय, बसव चेतन प्रकाशन, मिरज.

९. तिवारी भगवानदास (२००१), विश्वमानव बसवेश्वर, बसव शांतीमिशन प्रकाशन, धारवाड.

१०. साखरे एम. आर. हिस्ट्री ॲड फिलॉसाफी ऑफ लिंगायत रिलीजन.

संकेतस्थळे

1. www.wikipidia.com
2. www.inflibnet.ac.in
3. www.google.com/ mahatmabasveshwar

संशोधक | मार्गदर्शक

पंडित हणमंतराव श्रीरामे | **डॉ.व्ही. आय. पाटील**